

# मराठी (प्रथम भाषा) लेख-१७

आसावरी सुर्वे, शाळा : विद्या मंदिर, दहिसर

## पूर्वपरीक्षा अपेक्षित उत्तरपत्रिका (क्रमशः)

**प्र. ७ (क) खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराची लक्षणे सांगून उदाहरण लिहा.** (२)

**स्वभावोक्ती**

**लक्षण** : जेव्हा एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे किंवा त्याच्या हालचालीचे यथार्थपणे, हुबेहूब व वैशिष्ट्यपूर्ण वर्णन केले जाते तेव्हा 'स्वभावोक्ती' हा अलंकार होतो.

**उदाहरण** : वर भिवई चढली दात दाबती ओठ
छातीवर तुटली पटबंदाची गाठ
डोळ्यांत उठे काहूर ओलवे काठ
ज्ञानातून उसळे तलवारीची पात

**(ख) खालीलपैकी कोणतेही चार शब्द शब्दसिद्धीच्या साधित, उपसर्ग घटित, प्रत्ययघटित व अभ्यास यापैकी कोणत्या प्रकारांत येतात ते लिहा.**

| | |
|---|---|
| सामाजिक | प्रत्यय घटित |
| अभ्यास | उपसर्गघटित |
| धूसफूस | अंशाभ्यस्त |
| परकीय | प्रत्ययघटित |

**(ग) कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे कोणत्याही दोन वाक्यांत बदल करून ती वाक्ये पुन्हा लिहा.** (२)

१) शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्राथमिक शिक्षण मोफत हवे आणि सक्तीचे हवे.
२) तू गरीब घरातली आहेस तेव्हा तुला नोकरी केली पाहिजे.

**(घ) खालील वाक्य शुद्ध करून लिहा.** (२)

हुंडा-बिंडा काही द्यायचा नाही.

किंवा

**खालील वाक्यात योग्य त्या विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.**

'ते न्हाऊ द्या तुमच्याकडंच अण्णासाब!

**(च) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** (२)

(२) मान टाकणे- नामोहरण होणे.
मराठ्यांच्या सैन्यापुढे शत्रूने मान टाकली.
(३) हातपाय गारठणे- भीतीने अंग थंडगार पडणे.
बॉम्बस्फोटाच्या आठवणीने देखील माझे हातपाय गारठतात.

**प्रश्न ८ (क) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा.** (४)

पत्राचा विषय- क्रीडासाहित्य मागविण्यासाठी क्रीडासाहित्याच्या विक्रेत्यास पत्र लिहा.

क्रीडाप्रमुख अबक
विद्या मंदिर, दहिसर,
बोरिवली, मुंबई.
पिन- ४०००६८
दि. ८-१२-२००७

प्रति,
मा. विक्रेताप्रमुख,
झूम क्रीडासाहित्य भांडार,
मरीन लाईन्स विभाग,
मुंबई.

विषय- क्रीडासाहित्याची मागणी

महोदय,
सादर नमस्ते,

विद्यार्थ्यांच्या क्रीडा विभागासाठी आम्हाला काही महत्त्वाचे साहित्य मागणी करून नोंदविणे गरजेचे आहे. आपल्याकडील साहित्याचा दर्जा उत्तम आहे. क्रीडाप्रमुख या नात्याने पुढीलप्रमाणे क्रीडासाहित्य पाठविण्याची व्यवस्था करावी.

| क्रीडा साहित्य प्रकार | नग |
|---|---|
| १) लेझिम (मध्यम प्रकार) | १०० |
| २) डम्बेल्स | १०० |
| ३) व्हॉलीबॉल | १० |
| ४) व्हॉलीबॉल ट्यूब्स | २० |
| ५) नेट (लाल रंग) | ०२ |

वरील साहित्याबरोबर बिल द्यावे. उत्तम प्रतीचा माल पाठवावा. पत्रास त्वरित पोच द्यावी.
कळावे,
धन्यवाद

आपला नम्र
अबक
(क्रीडा विभाग प्रमुख)

**प्रश्न ८. (ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा.** (४)

**प्रश्न १-** नाट्यसंगीताने कोणाकडून प्रेरणा घेतली ?

**उत्तर-** नाट्यसंगीत अभिजात शास्त्रीय संगीतातून निर्माण झाले. नाटकाच्या कथानकानुसार किंवा नाट्यवस्तूला प्रभावीपणे सादर करण्यासाठी नाट्यसंगीताचा आविष्कार महत्त्वाचा आहे. हे नाट्यसंगीत जसे रागदारीच्या अंगाने व्यक्त झाले तसे ते लोकसंगीताकडून प्रेरणा घेऊन साकार झाले.

**प्रश्न २** लोककलांना आपले स्थान केव्हा मिळाले ?

**उत्तर-** लोकसंस्कृतीचे दर्शन घडविण्यासंदर्भात लोककलांचे योगदान मोठे आहे. विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोककलांना मानाचे स्थान मिळाले. लोककला विविधतेचे दर्शन घडवितात.

**प्रश्न ३-** नाट्यसंगीताचे स्वतंत्र शास्त्र कसे बनले ?

**उत्तर-** नाट्यसंगीत लोकप्रिय झाले. प्रतिभासंपन्न कलावंतांनी त्याचे रूपही आकर्षक केले. ही सर्जनशील निर्मिती रसिकांना आनंद देऊ लागली. स्वातंत्र्यानंतर लोककला, नाट्यकलेचा उत्कर्ष झाला. नाट्यसंगीत विविध अंगांनी बहरू लागले. नवनिर्मितीतून पुढे याचे स्वतंत्र शास्त्र निर्माण झाले. लोकसंगीतातून प्रेरणा घेतलेल्या नाट्यसंगीताचे संवर्धन झाले. स्वतंत्रशास्त्राने त्याचा आकृतीबंध तयार झाला.

**(ग) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर आवेदनपत्र तयार करा.**

श्री. गोविंद भिकाजी शिर्के (मु. पो. गावठणवाडी, ता. मालवण जि. सिंधुदुर्ग, पिन कोड ४१६५४०) हे मा. मुख्याध्यापक (सरस्वती विद्यालय, कणकवली, जि. सिंधुदुर्ग, पिनकोड ४१६५४१) यांच्याकडे शिपाई पदासाठी अर्ज करीत आहेत. या आवेदनपत्राचा नमुना तयार करा.

श्री. गोविंद भिकाजी शिर्के
मु. पो. गावठणवाडी, ता. मालवण,
जि. सिंधुदुर्ग, पिन- ४१६५४०
दिनांक ६-१२-२००७

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
सरस्वती विद्यालय,
कणकवली,
जि. सिंधुदुर्ग, पिन- ४१६५४१

विषय- शिपाई पदासाठी अर्ज

महोदय,
आपल्या प्रशालेची शिपायाचे रिक्त पद भरण्याविषयीची जाहिरात दि. २९-११-२००७ रोजी दैनिक 'लोकसत्ता'मध्ये वाचली. त्या पदासाठी मी हा अर्ज करीत आहे. माझी माहिती पुढीलप्रमाणे आहे.
नाव- गोविंद भिकाजी शिर्के.
जन्मतारीख- २ एप्रिल १९८२
पत्रव्यवहाराचा पत्ता- वरीलप्रमाणे.
शैक्षणिक पात्रता- एस. एस. सी. उत्तीर्ण (द्वितीय श्रेणी)
अनुभव- - - - - - - - -

आपला विश्वासू,
स्वाक्षरी
गो. भि. शिर्के

सोबत सहपत्रे- १) एस. एस. सी. गुणपत्रिका
२) एस. एस. सी. प्रमाणपत्र

**सोमवारचा विषय : भूगोल (पूर्व परिक्षा सराव प्रश्न पत्रीका)**

संपर्क : yashasvibhava2007@gmail.com

लोकसत्ता यशस्वी भव!
दहावी अभ्यास मालिका